महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका//न.क्र.०५
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६६५ दिनांक ०१ / ०१ / २०२४

**विषय** : 'एड्स' या आकस्मित आजाराकरिता विशेष रजेच्या सवलतीबाबत.

**संदर्भ** : सा.आ.क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३.

-----

सामान्य आदेश क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३ अंतर्गत आकस्मित आजारांकरिता विशेष रजेच्या तरतुदी विषद केलेल्या आहेत. तसेच या तरतुदी अंतर्गत सा.आ.क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३ चे सुधारपत्र क्र.६४ दि.२१.०७.१९९७ अन्वये 'एड्स' या आजाराचा समावेश आकस्मित आजारांमध्ये करुन त्यावरील औषधोपचाराच्या वैद्यकीय खर्चाची १००% प्रतिपूर्ती अनुज्ञेय करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे शासन निर्णय क्र. अरजा-२४०४/प्र.क्र.२५/०५/सेवा-८ दि.२०.०१.२००६ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-७९ मध्ये 'एड्स' या आजाराचा समावेश करण्यात आला असून सदर आजारावर उपचार सुरु असलेल्या कर्मचाऱ्यांना विशेष रजा लागू केलेली आहे. शासनाच्या धर्तीवर महावितरण कंपनीमधील जे अधिकारी व कर्मचारी 'एड्स' या आजारावर उपचार घेत आहेत अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच "विशेष रजा" अनुज्ञेय करण्याची बाब कंपनीच्या विचाराधीन होती.

३. आता, संचालक मंडळाने ठराव क्र.२७७५ दि.२६.१०.२०२३ अन्वये शासनाच्या धर्तीवर सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ मधील नमूद क्षयरोग/ कर्करोग/ कुष्ठरोग/ पक्षघात या आजारांकरिता अनुज्ञेय असलेल्या विशेष रजेच्या सवलती प्रमाणे 'एड्स' या आकस्मित आजाराकरिता "विशेष रजा" खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर रजेची सवलत देण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे:

क. शासन निर्णय दि.२०.०१.२००६ मध्ये नमूद जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या 'एड्स' रुग्णाच्या व्याख्येनुसार कंपनीतील जे अधिकारी व कर्मचारी 'एड्सग्रस्त' आहेत व त्यांच्यावर उपचार सुरु आहेत अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच 'एड्स' या आजाराकरिता "विशेष रजा" मंजूर करण्यात यावी.

ख. शासन निर्णय दि.२०.०१.२००६ निर्गमित झाल्यापश्चात 'एड्स' या आजाराचे निदान झाले असल्यास अशा अधिकारी व कर्मचारी यांना सदर आजाराच्या "विशेष रजेची" सवलत मंजूर करण्यात यावी.

ग. सदर "विशेष रजेचा" कालावधी हा जास्तीत जास्त एक (०१) वर्षाचा राहील.

घ. 'एच.आय.व्ही.' पॉझिटीव्ह हे एड्सग्रस्त रुग्ण नसल्याने त्यांना 'एड्स' या आजाराची "विशेष रजा" देय होणार नाही.

च. सदर विशेष रजा मंजूर करताना खालील कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

i. सदर "विशेष रजा" मंजूर करण्यापूर्वी संबंधीत एड्सग्रस्त अधिकारी व कर्मचारी यांच्या खात्यावर शिल्लक असलेली सरासरी वेतनावरील सर्व रजा उपभोगून झाल्यानंतर तो बरा होण्यासाठी त्याला आणखी रजेची आवश्यकता असल्याबाबत उपचार करणाऱ्या संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांने/ जिल्हा शल्यचिकित्सक अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यास त्याला जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत सरासरी वेतनावरील "विशेष रजा" मंजूर करण्यात येईल.

ii. कर्मचाऱ्याच्या खात्यावरील शिल्लक असलेली सरासरी वेतनावरील रजा संपेल त्या तारखेपासून सदर विशेष रजेची गणना करण्यात यावी.

iii. सदर "विशेष रजा" संपल्यानंतर तो बरा होण्यासाठी त्याला आणखी रजेची आवश्यकता असल्यास त्याचे खात्यावर रजा शिल्लक असल्यास अर्धसरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्यात यावी.

iv. अर्ध सरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर अशा कर्मचाऱ्याची नोकरी पुढे चालू रहावी यासाठी त्याच्या शारिरिक पात्रतेची तपासणी करण्यासाठी त्याला जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडे पाठविण्यात यावे आणि त्यांनी तसे निर्देश दिल्यास कर्मचाऱ्याला असाधारण बिनपगारी रजा मंजूर करण्यात यावी.

v. परंतु नियमान्वये मंजूर करण्यात आलेली एकूण रजा, संबंधीत कर्मचारी 'एड्स' या आजाराने आजारी पडल्यापासून, ज्या तारखेला रजेवर जाईल त्या तारखेपासून सर्व रजेचा कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक होता कामा नये या अटीच्या अधिन राहून रजा मंजूर करण्यात यावी.

४. म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियमातील अनुसूची-९ मधील तरतुदीनुसार सरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्यास सक्षम असलेले अधिकारी सदर "विशेष रजा" मंजूर करण्यास सक्षम असतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

( भूषण कुलकर्णी )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**
१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/ (वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) मुख्य अभियंता (देयके व महसुल), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**
१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.